क्र.जिपना/शिक्षण/प्राथ/मान्यता/का.क्र.२५/ 7709 /२१
कार्यालय जिल्हा परिषद नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :- 29/०९/२०२१

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
सर शांतीलाल बडजाते चॅरीटेबल ट्रस्ट,
शांतीनिकेतन, धरमपेठ, नागपूर

विषय :- **सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम चालविणा-या मान्यता प्राप्त शाळेला प्रथम खाते मान्यता देणेबाबत.**

संदर्भ :-

१. महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र. नाहप्र-२०१३/(७५/१३) माशि-१, दि. ०२/०८/२०१३
२. मा.अवर सचिव, म. शासन यांचे पत्र क्र. No. Noc-२००६/(३२९/२००६) SE -१ दि.३०/०६/२००६
३. मा.अवर सचिव, म. शासन यांचे पत्र क्र. No. Noc-२००६/(३२९/०६) SE -१ दि.०६/११/२००७
४.मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र.शिउस/प्राथ/ब/७०१७/१९, दिनांक ११ ऑगस्ट, २०१९.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या **सर शांतीलाल बडजाते चॅरीटेबल ट्रस्ट, शांतीनिकेतन, धरमपेठ एक्सटेंशन, नागपूर द्वारा संचलित द जैन** ईंटरनॅशनल **स्कुल, येरला व्हिलेज, काटोल रोड, नागपूर (इंग्रजी माध्यम, CBSE)**, या शाळेला सी.बी.एस.ई. मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावर खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून या कार्यालयमार्फत प्रथम खाते मान्यतेची परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१. सदर ना हारकत प्रमाणपत्र हे फक्त ३ वर्षासाठी वैद्य राहील. तसेच नाहरकत प्रमाणपत्र दर ३ वर्षानी नुतनीकरण करणे संस्थेवर बंधनकारक राहील. प्रथम नाहरकत प्रमाणपत्र हे शासन स्तरावरुन निर्गमीत केल्या जाईल व त्यानंतर प्रत्येक ३ वर्षानी विभागीय शिक्षण उप संचालक स्तरावर नुतनीकरण करण्यात यावे.
२. सदर नाहरकत प्रमाणपत्र कोणतीही पुर्व सुचना न देता, कोणत्याही वेळी व शासनाच्या कोणत्याही नियमांचे/अटी व शर्तीचे भविष्यात संस्थेकडुन उल्लंघन झाल्यास तसेच संस्थेने शासनाच्या निर्देशाची पुर्तता न केल्यास कोणतेही कारण न देता ( NOC परत घेण्याचे हक्क शासन राखुन ठेवत आहे.
३. जन्मप्रमाणपत्राच्या तारखेच्या आधाराव प्रवेश देण्यात यावा.
४. संस्थेने विद्यार्थ्यांची शिक्षक शुल्क व विशेष शुल्क ई. राज्य शासनाने नियुक्त केलेल्या शुल्क नियामक समितीने ठरविल्यानुसार घेण्यात यावी.
५. वर्गातील विद्यार्थी संख्या ईंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी ठरवलेल्या नियमानुसार असावी.
६. इयत्ता १ ली ते ५ वीपर्यंतच्या वर्गामध्ये उर्वरीत सर्व विषयांकरीता राज्य शासनाचा अभ्यासक्रम/एनसीईआरटीचा अभ्यासक्रम/संबधीत मंडळाचा अभ्यासक्रम यापैकी कोणताही अभ्यासक्रम शिकविण्याची मुभा राहील.
७. शाळेने ८ वी पर्यंत ३ भाषा धोरणाचा अवलंब करावा आणि मराठी ही द्वितीय भाषा राहील.
८. संस्थेने विद्यार्थी किंवा पालकांकडुन कोणतीही देणगी गोळा करु नये.
९. संस्थेने भविष्य निर्वाह योजना राबवावी.
१०. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार

अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२(सन २०१३ चा १) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

११. सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. आणि सदर शाळा ही फक्त स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावर चालविण्यात येईल.

१२. संदर्भिय ना हारकत प्रमाणपत्र हे ईयत्ता १२ वी पर्यंत लागु राहील. तसेच नाहरकत प्रमाणपत्र दर ३ वर्षांनी नुतनीकरण करणे संस्थेवर बंधनकारक राहील (मुद्दा क्रं १ नुसार).

१३. शाळेचे शैक्षणिक/लेखा परिक्षण तपासणी करण्याचे अधिकार राज्य शासन राखुन ठेवत आहे. शाळेला कोणतिही माहिती कोणत्याही वेळी मागीतल्यास सादर करणे अनिवार्य राहील.

१४. नियमानुसार संस्था रजीस्टर्ड असली पाहिजे.

१५. सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

१६. संस्थेने सदर शाळेला शैक्षणिक दृष्ट्या योग्य पुरेशी इमारत उपलब्ध करुण द्यावी.

१७. सदर संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र क्रीडांगणाची सोय उपलब्ध करुण द्यावी.

१८. संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करावा.

१९. संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

२०. संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

२१. संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर, क्रिडा साहित्य, कार्यानुभव साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

२२. संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक कक्ष निर्माण करावा.

२३. सदर शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ५ वीपर्यंतच्या वर्गामध्ये इतिहास व भुगोल हे विषय राज्य शासनाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमा नुसार शिकविणे बंधनकारक राहील.

२४. मुला/मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय असावी.

२५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अमलबजावनी केली पाहिजे.

२६. संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांच्या पटसंख्येवर विपरित परिणाम होणर नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२७. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे त्या ठिकाणा व्यतीरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास या कार्यालयाने दिलेली प्रथम खाते मान्यता परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२८. शासनाने प्रत्येक वर्गामध्ये ठरवून दिलेली विद्यार्थी संख्या असली पाहिजे.

२९. शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे शाळेने थांबविले असे निदर्शनास आल्यास या कार्यालयाने दिलेली प्रथम खाते मान्यता रद्द समजण्यात येईल व बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील नियम १२ नुसार शाळेची मान्यता काढून घेण्याची कारवाही करण्यात येईल.

**मान्यता प्राप्त वर्ग :- इयत्ता १ ली ते ८ वी**

(चिंतामण वंजारी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

**प्रतिलीपी माहितीस सविनय सादर :-**

१) मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुबंई-३२
२) मा.शिक्षण संचालक (प्राथ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे १
३) मा.शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग, नागपूर

**प्रत माहितीस रवाना :-**

१) मुख्याध्यापक, द जैन ईंटरनॅशनल स्कुल, येरला व्हिलेज, काटोल रोड, नागपूर

Principal
The Jain International School, Nagpur
CBSE Affiliation No.1130149

Manager
The Jain International School, Nagpur
CBSE Affiliation No.1130149